# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**<u>प्रेस नोट</u>**

<u>दिनांक 05/07/2021 (सोमवार)</u>

<u>(सायंकाळ)</u>

---

**<u>नागपूर ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यवाही</u>**

**<u>44 जनावरांना जिवदान, 02 आरोपी जेरबंद</u>**

दिनांक 21.03.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक सावनेर उपविभागांतर्गत पेट्रोलींग करीत असता मुखबिरद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, गाव सागर जि. मध्यप्रदेश येथुन ट्रक क्रमांक एमएच–31/एचएफ–8697 चे चालक हे त्यांचे वाहनामध्ये त्यांचे मालकाचे चिथावणीवरून व सांगणेवरून गोवंश जनावरे कत्तलीकरिता पो.स्टे केळवद हद्दीतुन घेवुन सावली मार्गे अमरावती येथे जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील सावली (मोह) रोड, सिंग स्टोन क्रेशर समोर नाकाबंदी करित असतांना, सावली गावाकडुन टाटा क्र. चा ट्रक क्रमांक एमएच–31/एचएफ–8697 यास ताब्यात घेवुन तपासणी केली असता, ट्रक मध्ये चालक 1) गजराजसिंग भगवानदास कुशवाह, वय 28 वर्ष, रा. बेगमगंज, झरैय्या मंदीर जवळ, तह. पोस्टे. बेगमगंज जि. रायसेन, मध्यप्रदेश तसेच त्याचा साथीदार ट्रक क्लीनर 2) नसिब बशीर खान, वय 29 वर्ष, रा. वार्ड नं. 15, सारंगपुर तह. पोस्टे. सारंगपुर जि. राजगड, मध्यप्रदेश यांचे ताब्यातील ट्रकमध्ये 44 गोवंशीय जातीचे जनावरे सर्व जनावरे बाबु खान रा. सारंगपुर तह. पोस्टे. सारंगपुर जि. राजगड, मध्यप्रदेश यांचे सांगणेवरून कत्तलीकरिता जि. अमरावती, महाराष्ट्र येथे घेउन जात असल्याचे सांगीतले. यावरून 44 गोवंशीय जनावरे यांचे निर्दयतेने गुदमरलेल्या स्थितीत दाटीवाटीने कत्तलीकरिता घेवुन जात असल्याचे दिसुन आल्याने, ट्रक क्रमांक एमएच–31/एचएफ–8697 किंमती 20,00,000/– तसेच एकुण 44 गोरे किंमती 4,40,000/– अशाप्रकारे एकुण 24,40,000/– किंमतीचा मुदेमाल जप्त करण्यात आला. तसेच ताब्यात घेण्यात आलेली गोवंश जनावरे यांना योग्य देखभालीकरिता व सुरक्षेकरिता जय श्रीकृष्ण भगवान गौरक्षण संस्था, गोंडेगाव, ता. नरखेड जि. नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. त्यासंबंधाने पोलीस ठाणे केळवद, नागपूर ग्रामिण येथे गुन्हा दाखल करण्यात येवुन आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास केळवद पोलीस करित आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. राकेश ओला, पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण, मा. श्री. राहुल माकणीकर, अपर पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली व श्री. अनिल जिट्टावार, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण यांचे आदेशाने सहा. फौज. बाबा केचे, पोहवा चंद्रशेखर घडेकर, निलेश बर्वे, नापोशि राजेंद्र रेवतकर, व चा.नापोशि अमोल कुथे यांचे पथकाने पूर्ण केली आहे.






पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर